महाराष्ट्र शासन

आदिवासी संशोधन व प्रशिक्षण संस्था,
२८,क्वीन्स गार्डन, जुने सर्किट हाऊस जवळ,पुणे-४११००१
E-mail: cevt.trti@gmail.com
Website: trti.maharashtra.gov.in
दुरध्वनी- ०२०-२६३३०८५४

# अनिवासी पोलीस व सैन्य भरती परीक्षा पूर्व प्रशिक्षण या कार्यक्रमा अंतर्गत महाराष्ट्र राज्यातील पात्र अनुसूचित जमातीच्या उमेदवारांसाठीव प्रशिक्षण संस्थांकरीता सर्वसाधारण सूचना

सन **२०२४-२५** पासून शासनाच्या सर्वंकष धोरणांतर्गत आदिवासी संशोधन व प्रशिक्षण संस्था, पुणे मार्फत महाराष्ट्र राज्यातील अनुसूचित जमातीच्या उमेदवारांसाठी **अनिवासी पोलीस व सैन्य भरती परीक्षा पूर्व प्रशिक्षण कार्यक्रम योजना** राबविण्यात येत आहेत. उपरोक्त नमूद पूर्व प्रशिक्षण योजनेची अंमलबजावणी करण्यासाठी ई-निविदा प्रक्रीयेद्वारे खाजगी प्रशिक्षण संस्थांना नामनिर्देशित (Empanel) करण्यात आले. विद्यार्थ्यांना प्रशिक्षण संस्था निवडीकरीता विकल्प पोर्टल उपलब्ध करून देण्यात आले होते. त्यानुसार प्रशिक्षण संस्थांनी सदरच्या विद्यार्थ्यांच्या मूळ कागदपत्रांची तपासणी करून **दि. १६ डिसेंबर, २०२४** पासून पूर्व प्रशिक्षण कार्यक्रम सुरू करण्यात आलेला आहे. त्याअनुषंगाने अभ्यास साहित्य व साधन सामुग्री (कीट) वाटप करण्याबाबत या कार्यालयामार्फत कळविण्यात आले होते. तथापि, सदरच्या वाटप करण्यात येणारे अभ्यास साहित्य व साधन सामुग्री (कीट) बाबत काही उमेदवारांचे आक्षेप प्राप्त झाले असल्याकारणामुळे खालीलप्रमाणे ऐच्छिक पर्याय उपलब्ध करून देण्यात येत आहे.

**पर्याय क्रमांक १**- ज्या पात्र उमेदवार यांना प्रशिक्षण संस्थेकडून **साधन सामुग्री (कीट) घ्यावयाचे नसल्यास** त्यांना सदर कीटच्या रकमेचा थेट लाभ हस्तांतरण विकल्प निवडण्याचा पर्याय असेल. सदर रक्कम आदिवासी संशोधन व प्रशिक्षण संस्था, पुणे मार्फत प्रशिक्षण संस्थेच्या प्राप्त देयकातून / प्रशिक्षण शुल्कातून प्रति उमेदवार रु.५,०००/- याप्रमाणे वजा करून उमेदवारास अदा करण्यात येईल.याबाबत संबंधित प्रशिक्षण संस्थेने सविस्तर अहवाल **प्रपत्र "अ"** प्रमाणे या कार्यालयास **दि. ०५/०२/२०२५** पर्यंत सादर करणे गरजेचे राहील. तदनंतर उमेदवार यांना साधन सामुग्री (कीट) याबाबतचे रु.५,०००/-थेट लाभ हस्तांतरणद्वारे अदा करण्यात येतील.

**पर्याय क्रमांक २**- ज्या पात्र उमेदवार यांना प्रशिक्षण संस्थेकडून **साधन सामुग्री (कीट) घ्यावयाचे असल्यास** दि. ११/१२/२०२४ रोजी https://trti.maharashtra.gov.in/ या संकेत स्थळावर प्रसिद्ध करण्यात आलेल्या सूचनानुसार नमूद प्रशिक्षण साहित्यांचे प्रत्येकी २ संचयाप्रमाणे देण्यात यावे. त्याप्रमाणे संबंधित प्रशिक्षण संस्थेमार्फत **प्रपत्र "ब"** प्रमाणे या कार्यालयास साधन सामुग्री (कीट) वाटप केल्याचा अहवाल सादर करण्यात यावा.

(डॉ. राजेंद्र भारूड, भा.प्र.से.)
**आयुक्त,**
**आदिवासी संशोधन व प्रशिक्षण संस्था,**
**महाराष्ट्र राज्य, पुणे.**

## <u>प्रपत्र अ -</u>

**प्रति,**

**मा,आयुक्त .**
**आदिवासी संशोधन व प्रशिक्षण संस्था पुणे ,**
**२८, क्वीन गार्डन,पुणे - ४११ ००१**
**महाराष्ट्र राज्य**

**विषय :**सन २०२४-२५ करीता पोलीस व सैन्य भरती परीक्षा पूर्व प्रशिक्षण योजने अंतर्गत प्रशिक्षण संस्थेकडून **<u>साधन सामुग्री (कीट) घ्यावयाचे नसल्यास</u>** त्यांना सदर कीटच्या रकमेचा थेट लाभ हस्तांतरण करण्याबाबत..

**महोदय,**

मी, संचालक/अध्यक्ष ______________________________(प्रशिक्षण संस्थेचे नाव) आपणांस कळवू इच्छितो की, आदिवासी संशोधन व प्रशिक्षण संस्था, पुणे मार्फत सन २०२४-२५ करीता पोलीस व सैन्य भरती परीक्षा पूर्व प्रशिक्षण योजने अंतर्गत प्रशिक्षण संस्थेकडून **साधन सामुग्री (कीट) घ्यावयाचे नसलेल्या उमेदवारांची यादी** खालीलप्रमाणे सादर करत आहे.

त्यानुसार खालीलप्रमाणे नमूद प्रशिक्षणार्थींना कीटच्या रकमेचा थेटलाभहस्तांतरण करण्यासाठी विहित नमुन्यात यादी सादर करत आहे .

**कीटच्या रकमेचा थेट लाभ हस्तांतरण करण्यात येणाऱ्या उमेदवारांची यादी**

| Sr. No | Application ID | Name of Student | Aadhar No. | Bank Name | IFSC Code | Account No. | Mobile No. |
|---|---|---|---|---|---|---|---|
| 1 | | | | | | | |
| 2 | | | | | | | |
| 3 | | | | | | | |
| 4 | | | | | | | |
| 5 | | | | | | | |

मी ______________________(प्रशिक्षण संस्था प्रमुखाचे नाव) असे प्रमाणित/सत्यापित करून देतो की, उपरोक्त तक्त्यात नमूद केलेली विद्यार्थ्यांची माहिती बरोबर असून व यादीतील विद्यार्थ्यांचे बँक खाते हे आधार कार्डशी सलंग्न आहे. तसेच त्यांच्या बँक खात्याची केवायसी (KYC) प्रक्रिया पूर्ण झाली आहे. तरी उपरोक्त यादीतील विद्यार्थ्यांच्या थेट लाभ हस्तांतरण करण्यासाठी काही तक्रारी/अडचणी उद्भवल्यास आमची प्रशिक्षण संस्था सर्वस्वी जबाबदार राहील.

प्रशिक्षण संस्था प्रमुखाचे नाव

स्वाक्षरी___________

संस्थेचा शिक्का _________

(टीप -सदरचे पत्र हे प्रशिक्षण संस्थेच्या लेटर हेडवर देण्यात यावे.)

# प्रपत्र -ब

**प्रति,**

**मा,आयुक्त .**
**आदिवासी संशोधन व प्रशिक्षण संस्था पुणे ,**
**२८, क्वीन गार्डन,पुणे - ४११ ००१**
**महाराष्ट्र राज्य**

**विषय :** सन २०२४-२५ करीता पोलीस व सैन्य भरती परीक्षा पूर्व प्रशिक्षण योजने अंतर्गत प्रशिक्षण संस्थेकडून **साधन सामुग्री (कीट)** वाटप केलेल्या प्रशिक्षणार्थींची माहिती सादर करण्याबाबत..

**महोदय,**

मी, संचालक/अध्यक्ष ________________________________(प्रशिक्षण संस्थेचे नाव) आपणांस कळवू इच्छितो की, आदिवासी संशोधन व प्रशिक्षण संस्था, पुणे मार्फत सन २०२४-२५ करीता पोलीस व सैन्य भरती परीक्षा पूर्व प्रशिक्षण योजने अंतर्गत प्रशिक्षण संस्थेकडून **साधन सामुग्री (कीट)** वाटप केलेल्या उमेदवारांची यादी खालीलप्रमाणे सादर करत आहे.

**प्रवेशित विद्यार्थी यादी**

| Sr.No | Application ID | Name of Student | Kit-1 (Tracksuit, T-Shirt, Pant & Shoe Pair) | Kit-2 (Tracksuit, T-Shirt, Pant & Shoe Pair) | Sign of Student |
|---|---|---|---|---|---|
| 1 | | | | | |
| 2 | | | | | |
| 3 | | | | | |
| 4 | | | | | |
| 5 | | | | | |

मी ________________________(प्रशिक्षण संस्था प्रमुखाचे नाव) असे प्रमाणित/सत्यापित करून देतो की, उपरोक्त तक्त्यात नमूद केलेली विद्यार्थ्यांना सन २०२४-२५ करीता पोलीस व सैन्य भरती परीक्षा पूर्व प्रशिक्षण योजने अंतर्गत आमच्या प्रशिक्षण संस्थेकडून साधन सामुग्री (कीट) उपलब्ध करून देण्यात आलेले आहे.

सदरची माहिती बरोबर असून भविष्यात याबाबत काही तक्रारी/अडचणी उद्भवल्यास आमची प्रशिक्षण संस्था सर्वस्वी जबाबदार राहील.

प्रशिक्षण संस्था प्रमुखाचे नाव

स्वाक्षरी__________

संस्थेचा शिक्का ________

(टीप -सदरचे पत्र हे प्रशिक्षण संस्थेच्या लेटर हेडवर देण्यात यावे.)